**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०८ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **२०४७ मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण व्हावं, असा लोकसभेत 'वंदे मातरम' वरील चर्चेला सुरुवात करताना पंतप्रधान मोदी यांचा पुनरूच्चार.**
2. **विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आज पासून नागपुरात सुरुवात; पहिल्याच दिवशी ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर.**
3. **मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
4. **महाराष्ट्राच्या महाधिवक्तापदी ज्येष्ठ विधिज्ञ मिलिंद साठे यांची नियुक्ती होणार.**
5. **नागपुरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचं नाव; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नामकरण सोहळा.**

---------------------------------------

संसद

वंदे मातरम हे गीत आपली उर्जा आणि प्रेरणा बनावं, देश आत्मनिर्भर बनावा आणि २०४७ मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण व्हावं, या स्वप्नाचा पुनरुच्चार करण्याची संधी या गीताच्या दीडशेव्या वर्षपूर्तीने दिली आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत वंदे मातरम गीतावरच्या चर्चेला सुरूवात करताना ते बोलत होते. नुकताच आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आणि आता आपण या गीतातून मिळणाऱ्या उर्जेची सामूहिक अनुभूती घेत आहोत, असं मोदी म्हणाले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांसाठी वंदे मातरम हाच उर्जामंत्र होता असं मोदी म्हणाले....

***(होल्ड बाईट - पंतप्रधान मोदी)***

***हमारे जांबाज सपूत बिना किसी डर के फांसी के तख्त पर चढ़ते थे और आखिरी सांस तक वंदे मातरम, वंदे मातरम, वंदे मातरम यही उनका भाव घोष रहता था। खुदीराम बोस, मदन लाल ढींगरा, रामप्रसाद बिस्मिल, अशफाक़ उल्ला ख़ाँ, रोशन सिंह, राजेंद्रनाथ लाहिड़ी, रामप्रसाद विश्वास अनगिनत जिन्होंने मंदे मातरम कहते कहते हैं फांसी के फंदे को अपने गले पर लगाया था।***

वंदे मातरमच्या सुवर्ण महोत्सवी काळात देश गुलाम होता, तर शतक महोत्सवी काळात आणीबाणी आणि संविधानावर गळचेपी होती. आता दीडशे वर्षांनी तीच ऊर्जा पुनरुज्जीवित करण्याची वेळ आली आहे, असं पंतप्रधान म्हणाले. तर बंगालच्या पवित्र भूमीने देशाला केवळ 'वंदे मातरम' नव्हे तर राष्ट्रगीतही दिलं, असं काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी चर्चेत म्हटलं.

---------------------------------------

नागपूर अधिवेशन-पहिला दिवस

विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरू झालं. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आज वंदे मातरम या राष्ट्र गानाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दोन्ही सभागृहांच्या कामकाजाच्या सुरूवातीलाच मानवंदना देण्यात आली. ऐकुया आजच्या कामकाजाबद्दलचा हा सविस्तर रिपोर्ट आमच्या प्रतिनिधींकडून -

***(कॅप्सूल - नम्रता - २ मिनिट ५५ सेकंद)***

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं आज ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यातले १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी ६ हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे ३ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी ३ हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी २ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. आयुष्मान भारतासाठी सव्वा ३ हजार कोटी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी २ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद सरकारनं यात केली आहे. विधानसभेत तालिका अध्यक्ष म्हणून चैनसुख संचेती, समीर कुणावार, किशोर पाटील, सरोज अहिरे, राहुल पाटील, उत्तम जानकर आणि रामदास मसराम यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली. काँग्रेस नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला. यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज यावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता त्यावर वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी

पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यानंतर विधानसभेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानपरिषदेत तालिका अध्यक्ष म्हणून अमित गोरखे यांची निवड करण्यात आली. तसंच अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, सुनील शिंदे, कृपाल तुमाने यांची तालिका सदस्यपदी निवड झाल्याची घोषणा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, पणन मंत्री, ग्रामविकास मंत्री, कामगार मंत्री यांनी अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवले. त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. दरम्यान, अधिवेशनात धोरणात्मक निर्णय, विविध प्रलंबित प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या समस्या या बद्दल सरकार कडून ठोस काही सांगण्यात आलं नसल्याचा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी नागपुरात विधिमंडळ परिसरात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना केला -

***(होल्ड बाईट- आदित्य ठाकरे)***

***हे नेमकं अधिवेशन आपण पाहतोय म्हणतात सात दिवसांचं,चर्चा आहे पाच दिवसात उरकतील तसं पाहल्या गेलं सगळ्यात मोठं जे काही कामकाज आहे हे सप्लिमेंटरी म्हणजे पुरवण्या मागणे काय नक्की तुम्ही चर्चेला आणणार आहात कुठेतरी काही पॉलिसी चर्चा आणणार आहेत का जे शेतकऱ्यांचं नुकसान झालं त्यांच्यावर चर्चा होणार आहेत का? काय मदत तुम्ही दिली त्याच्यावर चर्चा होणार आहेत का शहरांचं जे आपण पाहतोय सगळी वाट लागत चाललीय त्याच्यावर चर्चा होणार आहेत का ? अजनीवन असेल तपोवण असेल पुण्यातल रिव्हर फ्रंटच पूर्ण विनाश करण्याचं प्रयन्त असेल ह्याच्यावर चर्चा होणार आहेत का.***

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर असून त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी असल्याचे राज्य मंत्री आशिष जैस्वाल यांनी सांगितलं आहे.

***(होल्ड बाईट - जैस्वाल - २८ सेकंद)***

***शेतकऱ्यांच्या बाजूने शासन गंभीरपणे उभा आहे जे जे वचने आम्ही शेतकऱ्यांना दिले होते ते ते आम्ही टप्याटप्याने पूर्ण करत आहोत विशेषकरून आपल्या सर्वांना माहितीसाठी सांगतो कि साधे हॉर्स पॉवर पर्यंत आपण जे कृषी पम्पाच बिल आपण माफ केलं त्याचा सरकारवर जो ओझं आहे तो सुमारे २७ हजार कोटींच्या वर या वर्षी गेलेला तरीदेखील शेतकर� यांपासून कुठले इलेक्ट्रिकलची वसुली***

***काँग्रेसचे सरकारप्रमाणे आपण करत नाही आहोत अतिवृष्टी झालेले नुकसान झालं, त्याची सर्वोपरी मदत त्या ठिकाणी करण्यात आलेली आहेत.***

---------------------------------------

पाणंद रस्ते योजना

नागपूर इथं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेला मंजुरी देण्यात आली. यामुळे आता शेत रस्ते तयार करण्यासाठी १०० टक्के यंत्रसामुग्रीचा वापर करता येणार आहे. सध्या मनरेगा अंतर्गत रस्ते तयार करताना अनेक जाचक अटी होत्या, तसेच मजुरांच्या उपलब्धते अभावी कामे रखडत होती. मात्र, आता शेतीतील वाढते यांत्रिकीकरण लक्षात घेऊन नवीन योजनेत यंत्राच्या साहयाने रस्ते तयार केले जातील. यामुळे शेतकऱ्यांना पेरणी, कापणी आणि शेतमाल बाजारात नेण्यासाठी बारमाही मजबूत रस्ते उपलब्ध होणार आहेत. या योजनेसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, २५ कि.मी. लांबीचे क्लस्टर तयार करून निविदा प्रक्रियेद्वारे ही कामे जलदगतीने पूर्ण केली जातील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६(४) मध्ये सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. त्यामुळे भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी अकृषिक कारणासाठी बँकांकडे गहाण ठेवताना आकारल्या जाणाऱ्या तारण शुल्काबाबतचा कायदेशीर पेच आता सुटणार आहे.

---------------------------------------

महाधिवक्ता

ज्येष्ठ विधिज्ञ मिलिंद साठे यांची महाराष्ट्राच्या महाधिवक्ता पदी नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळान घेतला आहे. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मिलिंद साठे मुंबई उच्च न्यायालयात वरिष्ठ वकील म्हणून काम करत आहेत. यापूर्वी ते मुंबई बार असोसिएशनचे अध्यक्षही होते. यापूर्वीचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी वैयक्तिक कारणांमुळे पदाचा राजीनामा दिला होता.

---------------------------------------

संत जगनाडे महाराज

काही रुढीवादी लोकांनी संत तुकाराम महाराजांच्या गाथा पाण्यात बुडविल्या, मात्र संत जगनाडे महाराजांनी त्या गाथा वाचवून तुकाराम महाराजांचे विचार सर्वसामान्य

लोकांपर्यंत पोहचविले, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं .कौशल्य विकास विभागांतर्गत रामदासपेठ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचं नाव देण्यात आलं. यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा होते.

---------------------------------------

हॉकी

FIH हॉकी पुरुष कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जर्मनीनं भारतावर ५-१ अशा मोठ्या फरकानं मात केली. भारताकडून अनमोल एक्का यानं एकमेव गोल केला. आता भारताचा कांस्यपदकासाठीचा सामना बुधवारी अर्जेंटिनाविरुद्ध होईल, तर अंतिम फेरीत जेतेपदासाठी जर्मनीसमोर स्पेनचं आव्हान असेल.

---------------------------------------

ध्वजनिधी

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत नागपूर इथं सुरुवात झाली. शहीद जवानांच्या कुटुंबांना दिली जाणारी मदतीची रक्कम वाढवून एक कोटी केली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. सैन्यदलाच्या शौर्यामुळे देशाच्या सीमा सुरक्षित आहेत, जवानांच्या जीवनाचं मोल करता येत नाही, पण त्यांच्या कुटुंबीयांसाठी या मदतीची गरज असल्याचं ते म्हणाले.

---------------------------------------

हवामान

विदर्भात सर्व जिल्ह्यांमध्ये शीतलहर जाणवत आहे. किमान तापमानात सातत्याने घट होत असून आज सर्वात कमी किमान तापमान यवतमाळ इथं आठ पूर्णांक आठ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ गोंदिया इथं नऊ अंश सेल्सिअस तर नागपूर आणि अमरावती इथं 9 पूर्णांक 6 तर अकोला आणि गडचिरोली इथं दहा पूर्णांक सहा इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.

---------------------------------------